मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रावेतच्या नवीन बंधाऱ्यासाठी निधी द्या : आमदार शंकर जगताप

## पिंपरी-चिंचवडच्या पाणीप्रकल्पांना वेग; 105 कोटींच्या आधुनिक बंधाऱ्यामुळे पाणीटंचाईवर दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या प्रकल्पांना आता वेग आला आहे. आंद्रा धरणातून पाणी उचलण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे हस्तांतरण आणि रावेत येथील ब्रिटिशकालीन बंधाऱ्याचे आधुनिकीकरण या दोन महत्त्वपूर्ण गोष्टीचा पाठपुरावा आमदार शंकर जगताप यांच्याकडून केला जात आहे. यासंदर्भात भाजपा महायुती सरकार सकारात्मक असून, आंद्रा धरणातून पाणी उचलण्यासाठी आवश्यक जमिनीचे हस्तांतर कायमस्वरूपी करणे आणि रावेतच्या नवीन बंधाऱ्यासाठी 105 कोटी रुपयांची निधी देण्याची मागणी आमदार शंकर जगताप यांनी महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अनुदानाच्या मागण्यांदरम्यान केली. या माध्यमातून पाणी टंचाईवर तोडगा निघणार असून, शहरवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.



### रावेतच्या नवीन बंधाऱ्यासाठी निधी द्या

» दरम्यान शहराला पाणीपुरवठा करणारा रावेत येथील पवना नदीवरील बंधारा ब्रिटिशकालीन असल्याने तिथे मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. या गाळामुळे पाणीपुरवठ्यात अडथळा निर्माण होऊन दररोज सुमारे ५ कोटी लिटर पाणी वाया जाते. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून जुन्या पद्धतीचा बंधारा बदलून तिथे व्हर्टिकल लिफ्ट शाफ्ट (उभी उचल पद्धत) हा तांत्रिकदृष्ट्या प्रगत बंधारा बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधुनिक बंधाऱ्यामुळे गाळ साचण्याची समस्या दूर होईल आणि पाण्याचा अपव्यय थांबेल. या प्रकल्पासाठी १०५ कोटी रुपयांचा सविस्तर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून, त्याला तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली आहे .

याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले, शहराला हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी मावळ तालुक्यातील मौजे शिरे येथील 0.95 हेक्टर जमीन जलसंपदा विभागाकडून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. या ठिकाणी जॅकवेल, अप्रोच चॅनेल, पंप हाऊस आणि सबस्टेशन उभारले जाणार आहे. मुख्य अभियंता (जलसंपदा) यांनी हा प्रस्ताव महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे पाठवला असून, या जमिनीचे मूल्यांकन व हस्तांतरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. यामुळे आंद्रा धरणाचे पाणी थेट शहरात पोहोचवण्यातील तांत्रिक अडथळे दूर होणार आहेत.

### ठळक मुद्दे..

- » मौजे शिरे येथील 0.95 हेक्टर जमिनीचे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव
- » नवीन रावेत बंधाऱ्यासाठी १०५ कोटींचा खर्च करून व्हर्टिकल लिफ्ट शाफ्ट तंत्रज्ञानाचा वापर करणार.
- » दररोज वाया जाणारे ५ कोटी लिटर पाणी वाचणार.
- » पाणी टंचाईवर तोडगा काढण्यासाठी जलनियोजनावर भर.

> "पिंपरी-चिंचवडकरांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये. यासाठी आंद्रा धरण प्रकल्प आणि रावेतचा नवीन बंधारा अत्यंत महत्त्वाचा आहे. या दोन्ही कामांना गती मिळावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू असून, पाणी टंचाईवर तोडगा काढून पाणीपुरवठ्याचे नियोजन मार्गी लावणे हे आमचे प्राधान्य आहे."
>
> - शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड शहर

# कासारवाडीत गॅस सिलेंडरचा साठा जप्त; अन्न-धान्य पुरवठा विभागाची मोठी कारवाई

## दोन टेम्पोमधून 57 भरलेले व 207 रिकामे सिलेंडर जप्त; बेकायदेशीर रिफिलिंगचा संशय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात अन्न-धान्य पुरवठा विभागाने मोठी कारवाई करत मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडरचा साठा जप्त केला आहे. कासारवाडी येथे दोन टेम्पोमधून 57 भरलेले आणि 207 रिकामे भारत गॅसचे सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अन्न-धान्य पुरवठा विभागाच्या पथकाने संशयाच्या आधारे कासारवाडी येथे छापा टाकला. यावेळी दोन टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडर आढळून आले. तसेच टेम्पोच्या बाजूला गॅसचे सीलही सापडल्यामुळे या ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यावसायिक गॅसमध्ये बेकायदेशीर रिफिलिंग केले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



दरम्यान, जप्त केलेले सिलेंडर आणि टेम्पो ताब्यात घेण्यात आले असून या प्रकरणाचा अधिक तपास अन्न-धान्य पुरवठा विभागाकडून सुरू आहे. संबंधित व्यक्तींची चौकशी केली जात असून नियमांचे उल्लंघन आढळल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्न-धान्य पुरवठा विभागाचे परिमंडळ अधिकारी विजय कुमार क्षीरसागर यांनी दिली आहे.

# महिला दिनानिमित्त विठ्ठल हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिर आणि जनजागृती उपक्रम उत्साहात

## महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर; तज्ज्ञांचे मार्गदर्शन व आरोग्य जनजागृती कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मोशी येथील विठ्ठल हॉस्पिटलच्या वतीने महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आणि जनजागृती उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. महिलांच्या आरोग्याप्रती समाजात जागरूकता निर्माण व्हावी आणि त्यांना आपल्या आरोग्याच्या विविध टप्प्यांवर योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन आमदार उमा खापरे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसेविका सुलभा उबाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. भाग्यश्री लहाने मुंडे , डॉ. गणेश मुंडे यासह विठ्ठल हॉस्पिटलचे डॉक्टर, तज्ञ आणि कर्मचारी उपस्थित होते.







याप्रसंगी महिलांच्या आरोग्याबाबत अत्यंत उपयुक्त ठरणारी 'मिनार्की टू मेनोपॉज' (MENARCHE TO MENOPAUSE) ही आरोग्य पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. या पुस्तिकेच्या माध्यमातून स्त्रियांच्या आयुष्यातील मासिक पाळीची सुरुवात ते रजोनिवृत्तीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यातील बदलांची आणि घ्यावयाची काळजी याबद्दलची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

या आरोग्य शिबिरामध्ये किशोरवयीन मुलींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्वांच्या आरोग्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने मासिक पाळीची सुरुवात आणि त्यादरम्यान किशोरवयीन मुलींनी घ्यावयाची काळजी, बदलती जीवनशैली आणि आहारामुळे वाढणारा 'पीसीओएस' (PCOS) व हार्मोनल असंतुलनाची समस्या, गर्भधारणा आणि माता आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच चाळीशीनंतर महिलांमध्ये होणारे शारीरिक व मानसिक बदल म्हणजेच रजोनिवृत्ती (MENOPAUSE) आणि त्या काळातील हार्मोनल बदलांना कसे सामोरे जावे, याबाबत महिलांना मौल्यवान माहिती देण्यात आली. आजच्या धावपळीच्या युगात महिलांमध्ये आढळणारे ॲनिमियाचे (रक्तक्षय) प्रमाण लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक उपाय आणि पोषणविषयक मार्गदर्शनही या शिबिरात करण्यात आले.

यावेळी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबद्दल जनजागृती करण्यात आली. हा कर्करोग टाळण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरणारी 'एचपीव्ही' (HPV) लस आणि तिचे महत्त्व यावर डॉक्टरांनी भर दिला. योग्य वयोगटातील मुली आणि महिलांनी ही लस घेतल्यास कर्करोगाचा धोका कसा टाळता येतो, याबद्दल उपस्थित महिलांचे शंकांचे निरसन करण्यात आले. शिबिरादरम्यान सहभागी महिलांना तज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला देण्यात आला. तसेच सीबीसी, ब्लड शुगर, टीएसएच, कॅल्शियम आणि कोलेस्ट्रॉल यांसारख्या आवश्यक रक्तचाचण्यांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली होती. महिलांच्या सर्वांगीण आरोग्याचा विचार करून विठ्ठल हॉस्पिटलने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# महापारेषणच्या उच्च क्षमतेच्या टॉवर लाईनखाली उंच 'पाम' झाडांची लागवड..

## अडथळा निर्माण झाल्यास पिंपरी चिंचवड शहर अंधारात जाण्याची शक्यता?..

**पिंपरी | प्रतिनिधी**

बिजलीनगर उड्डाणपूल ते भक्ती शक्ती उड्डाणपूल दरम्यान महावितरणच्या उच्च क्षमतेच्या टॉवर लाईनखाली उंच पाम झाडांची लागवड करण्यात आल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समितीचे पुणे जिल्हा सदस्य तथा शिवसेना पुणे जिल्हा संघटक संतोष रमाकांत सौंदणकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे नुकतीच केली आहे.





याबाबत सौंदणकर यांनी आयुक्तांना निवेदन दिले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बिजलीनगर उड्डाणपूल ते भक्ती शक्ती उड्डाणपूल दरम्यान महावितरणची उच्च क्षमतेची टॉवर लाईन गेली आहे. मात्र याच लाईनखाली महापालिकेच्या वतीने पाम ट्रीसारखी उंच वाढणारी झाडे लावण्यात आली आहेत. भविष्यात झाडांची वाढ झाल्यास ती टॉवर लाईनला अडथळा निर्माण करू शकतात. अशा परिस्थितीत सुरक्षेच्या कारणास्तव महापारेषणकडून झाडे तोडण्याच्या सूचना दिल्या जाऊ शकतात.

महापालिकेने मोठ्या खर्चाने लावलेली झाडे पुन्हा तोडावी लागल्यास सार्वजनिक निधीचा अपव्यय होण्याची शक्यता आहे. तसेच टॉवर लाईनखाली झाडे असल्यास ती तोडताना अपघात किंवा जीवितहानी होण्याचाही धोका असल्याचे सौंदणकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

याशिवाय सुशोभीकरणासाठी कमी उंचीची झाडे लावणे अपेक्षित असताना उंच वाढणाऱ्या झाडांची लागवड का करण्यात आली, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणात महापालिकेच्या उद्यान विभागामार्फत ठेकेदारांना लाभ देण्याचा प्रकार झाला आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

> **“हिंजवडी आयटीपार्कसह, किवळे, रावेत, पुनावळे, ताथवडे, आणि वाकड हा परिसर शहराच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. त्यामुळे महामार्गावरील रस्त्यांच्या संदर्भातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे आणि नवीन आठ ठिकाणी अंडरपास उभारणे हाच यावरील कायमस्वरूपी उपाय आहे. विधानसभेत हा प्रश्न मांडल्यानंतर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, ही कामे लवकरात लवकर मार्गी लावून मी हा परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे.”**
>
> **- मा. संतोष सौंदणकर, (महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती, पुणे जिल्हा - सदस्य तथा शिवसेना, पुणे जिल्हा संघटक)**

# शहरात 30 एप्रिलनंतर खोदाई बंद!

## पाणीपुरवठा, विद्युत आणि ड्रेनेज विभागांना पथ विभागाचा इशारा; अत्यावश्यक कामाशिवाय खोदाई केल्यास होणार दंड.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरात पावसाळ्यापूर्वीची रस्ते खोदाईची दुरूस्ती १ मे पासून सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे, महापालिकेच्या पाणी पुरवठा, विद्युत तसेच ड्रेणेज विभागाने आवश्यक असलेली खोदाईची कामे ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करावीत. त्यानंतर केवळ अत्यावश्यक कामांनाच खोदाई कामास परवानगी दिली जाणार असल्याच्या सूचना पथ विभागाने या विभागांना केल्या आहेत. याबाबत नुकतीच बैठक झाली असून त्यात या सूचना करण्यात आल्या आहेत.

महापालिकेच्या पथ विभागाकडून शहरात ड्रेणेज, पाणीपुरवठा, पावसाळी वाहिन्या, पोलीस प्रशासन, महाप्रीत, एमएनजीएल तसेच खासगी मोबाइल कंपन्यांकडून रस्त्यांची खोदाई केली जाते. महापालिकेकडून शुल्क आकारून या खोदाईस मान्यता दिली जाते. त्यानंतर रस्ते दुरूस्त करण्याची जबाबदारी महापालिकेच्या पथ विभागास देण्यात आली आहे. त्यामुळे पथ विभागाकडून दरवर्षी १ मे ते पावसाळा सुरू होईपर्यंत रस्त्यांची दुरूस्ती केली जाते.

त्यामुळे, प्रशासनाने या सर्व विभागांनी पथ विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार पुढील दिड महिन्यात खोदाईची कामे तातडीने संपविण्याच्या सूचना पथ विभागाने केलेल्या आहेत. तसेच १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी कोणत्याही विभागाला किंवा संस्थेला परवानगी दिली जाणार नाही, या कालावधीत खोदाई करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर थेट कारवाई करण्याचा इशाराही पथ विभागाकडून देण्यात आला आहे

मागील वर्षीही ३० एप्रिल पर्यंतच खोदाईस परवानगी दिली होती. त्यानंतर १ मे पासून रस्ते दुरूस्ती केली जाणार होती. मात्र, प्रशासनाकडून तातडीच्या खोदाईच्या नावाखाली ही मुदत १५ मे पर्यंत आयत्या वेळी वाढविण्यात आली. तर, दुसरीकडे शहरात ८ मे पासूनच पूर्वमोसमी पावसाला सुरूवात झाली. त्यानंतर पुढे मान्सून येईपर्यंत पावसाळा सुरू झाल्याने महापालिकेस पावसाळ्यात रस्त्यांची दुरूस्ती करण्याची वेळ आली होती.. मात्र, मागील वर्षाचा अनुभव असतानाही महापालिकेने पुन्हा यावर्षी तोच निर्णय घेतल्याने पाऊस लवकर आल्यास रस्ते तसेच राहण्याची शक्यता आहे.




### मागील वर्षाचा अनुभव डोळ्यासमोर

» मागील वर्षीही ३० एप्रिलपर्यंत खोदाईची मुदत ठेवण्यात आली होती. मात्र तातडीच्या कामांच्या कारणावरून ती १५ मेपर्यंत वाढवण्यात आली. त्याचवेळी पूर्वमोसमी पावसाला लवकर सुरुवात झाल्याने अनेक रस्ते अपूर्ण अवस्थेत राहिले आणि पावसाळ्यातच दुरुस्ती करावी लागली. यंदा पुन्हा त्याच पद्धतीने निर्णय घेतल्याने पाऊस लवकर आल्यास रस्त्यांची दुरवस्था कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### खोदाईसाठी अंतिम मुदत ३० एप्रिल

» महापालिकेच्या पथ विभागाने शहरातील विविध विभागांना ३० एप्रिलपर्यंत सर्व खोदाईची कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पाणीपुरवठा, ड्रेणेज, विद्युत तसेच इतर सेवा वाहिन्यांच्या कामांसाठी रस्त्यांची खोदाई केली जाते. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी १ मेपासून विशेष मोहीम सुरू होणार आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी मंजूर कामे तातडीने पूर्ण करावीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### मे ते ३० सप्टेंबर खोदाईस बंदी

» पावसाळ्यात रस्त्यांची स्थिती बिघडू नये यासाठी १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत रस्ते खोदाईस परवानगी दिली जाणार नाही. या कालावधीत सेवा वाहिन्या टाकण्यासाठी कोणत्याही विभागाला किंवा संस्थेला खोदाई करण्यास मनाई असेल. या नियमांचे उल्लंघन करून खोदाई केल्याचे आढळल्यास संबंधित विभाग किंवा संस्थांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेच्या पथ विभागाने दिला आहे.

# मद्यपी वाहनचालकांवर पुणे पोलिसांचा कडक इशारा; पुनरावृत्ती झाल्यास परवाना रद्द

## जानेवारीपासून दोन हजारांहून अधिक चालकांवर कारवाई; मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर पोलिसांची मोहीम

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे वाहतूक पोलिसांनी जानेवारीपासून आतापर्यंत दोन हजारांपेक्षा अधिक मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करून त्यांचे समुपदेशन केले आहे. मात्र, त्यानंतरही काही चालक पुन्हा मद्यपान करून वाहन चालवताना आढळत आहेत. पोलिसांनी आता अशा चालकांविरुद्ध कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती करणाऱ्यांचा वाहन परवाना रद्द करून कारागृहात टाकण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

पुण्यात मागील वर्षी ६ हजार ७०० मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली, त्यापैकी ६७ जण दुसऱ्यांदा मद्यपान करून वाहन चालवताना आढळले, त्यांचा वाहन परवाना रद्द करण्यात आला. काहींना न्यायालयाने कारागृहात पाठवले होते. यावर्षी झालेल्या कारवायांमध्येही १४ जण दुसऱ्यांदा मद्यपान करून वाहन चालवताना सापडले असून त्यांच्या विरोधातही कडक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

पुणे शहर वाहतूक विभागाने ६ ते ८ मार्च दरम्यान शहरातील विविध भागांमध्ये विशेष मोहीम राबवली. या काळात शहरात ३० ठिकाणी नाकाबंदी करून ब्रेथ ॲनालायझरच्या साहाय्याने वाहन चालकांची तपासणी करण्यात आली.

त्यात १८९ चालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत पकडलेल्या चालकांचे ११ मार्चला येरवडा येथील वाहतूक शाखेच्या पोलीस उपायुक्त कार्यालयात समुपदेशन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला १३५ मद्यपी वाहनचालक उपस्थित होते. त्यावेळी मद्यपानानंतर वाहन चालविण्याचे गंभीर परिणाम आणि नियमांचे पालन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले होते.



> मद्यपान करून दुसऱ्यांदा वाहन चालवताना सापडलेल्या व्यक्तीचा परवाना रद्द करण्यात येणार आहे. तसेच, त्याला न्यायालयात हजर करून कारागृहात रवानगी करण्याची प्रक्रियाही राबवली जाईल.
>
> \- मनोज पाटील, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग

> मद्य पिऊन वाहन चालवल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होतात. यामुळे ही मोहीम तीव्र करुन प्रादेशिक परिवहन कार्यालयालाही सहभागी करुन घ्यावे. तसेच, महामार्गावरही अशीच मोहीम राबवली जावी. मद्यपान करुन वाहन चालवल्याने अपघात होण्याचे प्रमाण मोठे आहे
>
> \- राजू घाटोळे, अध्यक्ष, मोटार ड्रायव्हिंग स्कूल ओनर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य

# एलपीजी सिलिंडर टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांची घोषणा


## पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला गॅस पुरवठ्याचा आढावा; अत्यावश्यक सेवांसाठी सिलिंडरचा 'प्राधान्यक्रम' निश्चित.

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या एलपीजी सिलिंडरची टंचाई सुरू असून त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. घरगुती गॅस सिलिंडर व्यावसायिक वापराचा गॅस सिलिंडर आणि उद्योगासाठीचे गॅस सिलिंडर मिळत नसल्याचे चित्र आहे. पुण्यासारख्या शहरात हॉटेल आणि खानावळ बंद पडू लागल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी मोठी घोषणा करत सिलिंडर वाटपाचा प्राधान्यक्रम जाहीर केला आहे. यामुळे सर्वात अडचणीत आलेल्या घटकांना तातडीने सिलिंडर उपलब्ध होणार आहे.

पुणे जिल्ह्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांना त्याचा पुरवठा नियमितपणे केला जात आहे. त्यामुळे गॅस टंचाईबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. जिल्हाधिकारी म्हणाले की, जिल्ह्यातील रुग्णालये, आरोग्य संस्था, आपत्कालीन सेवा तसेच विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहांना गॅस सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचनाही प्रशासनाकडून संबंधित वितरक आणि तेल कंपन्यांना देण्यात आल्या आहेत. या अत्यावश्यक सेवांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन विशेष लक्ष ठेवून आहे.

अलीकडील काही दिवसांत समाज माध्यमावर तसेच विविध माध्यमांमधून गॅस टंचाईबाबत चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. जिल्ह्यातील सर्व एलपीजी वितरक तसेच प्रमुख तेल कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांना नियमितपणे सिलिंडरचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची टंचाई निर्माण झालेली नाही, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



### साठेबाजी आणि जादा दराविरोधात कारवाई

» गॅस सिलिंडरची कृत्रिम टंचाई निर्माण करणे, साठेबाजी करणे किंवा जादा दराने विक्री करणे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकरणांमध्ये जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी गॅस सिलिंडरचा अनावश्यक साठा करून ठेवू नये आणि अप्रमाणित संदेश किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. कोणतीही शंका असल्यास संबंधित गॅस वितरक किंवा जिल्हा पुरवठा विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने

» पुणे जिल्ह्यात एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून घरगुती वापरासाठी गॅसचा पुरवठा नियमितपणे केला जात असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांनी दिली. रुग्णालये, आरोग्य संस्था, आपत्कालीन सेवा तसेच विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृहांना गॅस सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. अत्यावश्यक सेवांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात आहे. त्यामुळे नागरिकांनी गॅस टंचाईबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

### गॅस वितरणावर प्रशासनाची कडक नजर

» जिल्हा प्रशासन आणि पुरवठा विभागामार्फत गॅस वितरण व्यवस्थेवर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. यासाठी जिल्हा आणि तालुका स्तरावर विशेष फिरती व दक्षता पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके गॅस एजन्सी, गोदामे आणि वितरण केंद्रांची तपासणी करत आहेत. सिलिंडरचा साठा, वितरणाची प्रक्रिया आणि ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची नियमित पडताळणी केली जात आहे. कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास संबंधित वितरकांवर तात्काळ कारवाई करण्याची तयारी प्रशासनाने दर्शवली आहे.

# फेब्रुवारीतच पुणेकरांच्या घशाला कोरड ! टँकरची संख्या वाढली...

## टँकरची मागणी साडेसहा हजारांनी वाढली असून, मार्च महिन्याच्या अखेरीस यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

उन्हाळा सुरू झाल्याने पाण्याची टंचाई जाणविण्यास सुरुवात झाली आहे. यंदा फेब्रुवारी महिन्यातच टँकरची मागणी साडेसहा हजारांनी वाढली असून, मार्च महिन्याच्या अखेरीस यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात ४६ हजार ०६८ टँकरच्या फेऱ्या झाल्या. गेल्या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात ३९ हजार ४८८ टँकर सुरू होते, तर त्या आधीच्या वर्षात फेब्रुवारी महिन्यात ३३ हजार ९५१ टँकर सुरू होते. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

डिसेंबरपासूनच शहरातील विविध भागांत टँकरची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात टँकरची मागणी वाढत असून, पुढील काही महिन्यांमध्ये उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेता टँकरचीही संख्या वाढणार असल्याचे निश्चित आहे. धनकवडी, कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, किरकिटवाडी, वडगाव बुद्रुक, धायरी, वाघोली, धानोरी, लोहगाव, सूस, पाषाण या भागांतून टँकरची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. ज्या भागांत महापालिकेला पाणीपुरवठा करण्यास जमत नाही, जेथे कमी दाबाने आणि अपुरा पाणीपुरवठा होतो किंवा जलवाहिन्यांचे जाळे विकसित झालेले नाही, त्या भागांत महापालिका टँकरद्वारे पाणीपुरवठा करते.

ज्या परिसरात महापालिका पाणीपुरवठा करू शकत नाही तेथे टँकरच्या माध्यमातून हे पाणी मोफत दिले जाते. तसेच, शहराच्या विविध भागांतील नागरिकांच्या मागणीनुसार महापालिका ठरावीक शुल्क घेऊन पाणीपुरवठा विभागाकडून टँकरद्वारे पाणी देते. खासगी ठेकेदारांना टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिका कमी दरात टँकर भरून देते. खाजगी टँकरच्या द्वारे देखील अनेक सोसायटी पाणी घेतात. यासाठी काही नियम घालून दिलेले आहेत. त्यांचे पालन करून निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने टँकर मालकांना पिण्याच्या पाण्याचे शुल्क आकारता येत नाही. मात्र याकडे दुर्लक्ष करत खाजगी टँकर चालक मनमानी पद्धतीने शुल्क आकारत असल्याचाही काही तक्रारी महापालिकडे येण्यास सुरुवात झाली आहे.




### यंदाची टँकरवाढ

» जानेवारी : ४२ हजार ५४२
» फेब्रुवारी : ४६ हजार ६८

### फेब्रुवारीतील टँकरची आकडेवारी

» २०२३-२४ : ३३ हजार ९५१फेब्रुवारी
» २०२४-२५ : ३९ हजार ४८८
» २०२५-२६ : ४६ हजार ०६८